# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | » पुणे, पिंपरी-चिंचवड | » बुधवार, दि. 6 नोव्हेंबर 2024 | पान- 1


# गृहनिर्माण संस्थांमधील मतदान केंद्रांवर शंभर टक्के मतदानाचा संकल्प

## महानगरपालिका, सोसायटी फेडरेशन आणि गृहनिर्माण संस्थाच्या समन्वय बैठकीत निर्धार : अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी माहिती दिली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदारसंघातील गृहनिर्माण सोसायट्या मधील मतदान केंद्रांवर १०० टक्के मतदान घडवून आणण्याचा निर्धार महानगरपालिका, सोसायटी फेडरेशन आणि गृहनिर्माण संस्थाच्या समन्वय बैठकीत करण्यात आला असून मतदार जनजागृती अभियानाअंतर्गत शहरतील सर्व गृहनिर्माण संस्थांना मतदार जनजागृतीसाठी आवश्यक असलेले साहित्य देखील महापालिकेच्या वतीने पुरविण्यात येत, असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली.




सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदार संघात मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त तथा स्वीप नोडल विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्या नियंत्रणाखाली मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात अतिरिक्त आयुक्त तथा स्वीप नोडल विजयकुमार खोराटे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील सोसायटी फेडरेशन आणि गृहनिर्माण संस्था यांच्या प्रतिनिधींसोबत समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती, या बैठकीत गृहनिर्माण संस्थांमधील मतदान केंद्रांवर १०० टक्के मतदान घडवून आणण्याचा निर्धार करण्यात आला.

"व्यक्तीपेक्षा पक्ष मोठा असतो पक्षासाठी काम करण्याच्या सूचना वरिष्ठांनी दिल्या आहेत. आम्ही एकत्रितपणे आमदार अण्णा बनसोडे यांचे काम करणार असून त्यांना ५० हजारांचे मताधिक्य मिळेल, असा विश्वास उमेदवार काळुराम पवार यांनी व्यक्त केला.

यावेळी उपआयुक्त अण्णा बोदडे, उप आयुक्त तथा २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी पंकज पाटील, महापालिकेच्या निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांच्यासह पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, उपाध्यक्ष सुभाष कर्णिक, महासंघाचे प्रतिनिधी, चिखली-मोशी हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, उपाध्यक्ष निलेश खांडगे, फेडरेशनचे पदाधिकारी तसेच शहरातील गृहनिर्माण संस्था व सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त खोराटे म्हणाले, आगामी विधानसभा निवडणुकीत शहरातील तीनही मतदार संघातील मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुषंगाने महापालिकेच्या स्वीप टीममार्फत शहरात विविध माध्यमातून अनेक ठिकाणी जाऊन मतदान जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.

मतदारांच्या सोयीसाठी तसेच मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी महापालिकेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या एकूण गृहनिर्माण संस्थांपैकी १५ मोठ्या गृहनिर्माण संस्थामध्ये एकूण २५ मतदान केंद्रे उभारण्यात आले आहेत. यामध्ये चिंचवड विधानसभा मतदारसंघामध्ये १२ मतदान केंद्र, पिंपरी विधानसभा मतदारसंघात ६ मतदान केंद्र तर भोसरी विधानसभा मतदारसंघात ७ असे एकूण २५ मतदान केंद्र उभारण्यात आले आहेत. या मतदान केंद्रांवर १०० टक्के मतदान घडवून आणण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. त्यानुसार महापालिकेच्या मतदार जनजागृती अभियानाअंतर्गत गृहनिर्माण संस्थांना मतदार जनजागृतीसाठी आवश्यक असणारे साहित्य महापालिकेमार्फत पुरविण्यात येत असल्याचे खोराटे यांनी सांगितले.

गृहनिर्माण संस्थांनी आपल्या परिसरातील बीएलओ यांच्या सोबत समन्वय ठेवून बदललेल्या मतदान केंद्रांची माहिती मतदारांना पोहचविण्यासाठी पुढाकार घेतल्यास निर्धारित लक्ष्य अधिक प्रभावीपणे साध्य होण्यास मदत होईल. तसेच गृहनिर्माण संस्थांमध्ये असलेल्या सांस्कृतिक समित्यांद्वारे मतदार जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करून मतदारांना मतदान करण्याबाबत प्रवृत्त करावे, असे आवाहन देखील अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी यावेळी केले.

नागरिकांना आपल्या मतदान केंद्राबाबत माहिती देण्यासाठी महापालिकेने नो यूवर पोलिंग स्टेशन सेवा सुरु केली . त्यानुसार ८८८८००६६६६ या सारथी हेल्पलाईन द्वारे नागरिकांना मतदान केंद्राबाबत माहिती देण्यात येत आल्याची माहिती महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे.

> "गृहनिर्माण संस्थांमधील १०० टक्के मतदानाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघ महापालिकेला सर्वतोपरी सहकार्य करेल तसेच महापालिकेच्या वतीने मतदानासाठी पुरविण्यात येणाऱ्या विविध सोयी सुविधा सोसायटीमधील प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचविण्यासाठी सक्रीय सहभाग घेईल.
> - सुहास पटवर्धन (अध्यक्ष, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघ)

# निवडणूक खर्चाबाबत निरीक्षक प्रकाश मीना यांच्या उमेदवारांना सूचना...

## उमेदवारांची आचारसंहिता व निवडणूक खर्च विषयक बाबी संदर्भात बैठक घेतली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदारसंघ निवडणूक चिन्ह वाटप प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांनी सर्व संबंधित उमेदवारांची आचारसंहिता व निवडणूक खर्च विषयक बाबी संदर्भात बैठक घेतली.




या बैठकीत सर्व उमेदवारांना त्याबाबतचे विहित नियमांची माहिती करून दिली. यावेळी पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठीचे निवडणूक खर्च निरीक्षक प्रकाश मीना हे उपस्थित होते.

प्रकाश मीना यांनी सर्व संबंधित उमेदवारांना निवडणूक खर्च विषयक बाबी संदर्भात मार्गदर्शन केले. तसेच उमेदवारांच्या शंकाचे माहिती देवून निरसन केले. यावेळी सहा. निवडणूक निर्णय अधिकारी जयराज देशमुख, नागु वाकसे, नायब तहसीलदार अभिजीत केंद्रेकर, निवडणूक खर्च नोडल अधिकारी माधुरी बांदल, मिडिया नोडल विजय भोजने उपस्थित होते. यावेळी पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठीचे निवडणूक खर्च निरीक्षक प्रकाश मीना हे उपस्थित होते.

# स्वस्त धन्य दुकानदार शासनदरबारी

## सरकारला कोंडीत पकडायचं प्रयत्न फसल्यानंतर आता हे आंदोलन मागे घ्यावे लागले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील गोरगरिबांना वाटप होणारे धान्य वाटप बंद करण्याचा इशारा स्वस्त धान्य दुकान चालकांनी दिला होता. मात्र, ते आंदोलन गुंडाळावे लागले आहे. निवडणुकीच्या काळामध्ये सरकारला कोंडीत पकडायचं प्रयत्न फसल्यानंतर आता हे आंदोलन मागे घ्यावे लागले. सध्या आचारसंहिता सुरू आहे. या प्रसंगी धान्य दुकानदारांच्या मागण्या ऐकून घेण्यासाठी राज्य शासनाचे प्रतिनिधी, राज्य सरकारमधले नेते उपलब्ध राहू शकणार नाहीत. त्यामुळे नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर या मागण्यांवर विचार केला जाणार आहे.



विविध प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी एक नोव्हेंबरपासून धान्य वाटप करणार नसल्याची भूमिका स्वस्त धान्य दुकानदारांनी घेतली होती. पिंपरी-चिंचवड शहरातील २५० दुकानदार देखील यामध्ये सहभागी होणार होते. धान्य वाटपावर मिळणाऱ्या कमिशनमध्ये वाढ करावी. या प्रमुख मागणीसह अनेक मागण्यांचे गाऱ्हाणे शासनदरबारी मांडण्याचे काम स्वस्त धान्य दुकानदारांनी केले आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. नुकतेच राज्य शासनाकडे दुकानदारांनी आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे.

महागाई निर्देशांकानुसार राज्यातील सर्व रास्त भाव धान्य दुकानदारांच्या मार्जीनमध्ये किमान ३०० रुपये प्रतिक्विंटल इतकी वाढ करावी, अशी मागणी केली होती. यासह इतर अनेक मागण्यांबाबत निवेदन देण्यात आले होते. त्याकडे दुर्लक्ष केल्याने आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र आचारसंहितेत त्याची दखल घेतली जाणार नाही. त्यामुळे निवडणुकीनंतर मागण्यांवर विचार केला जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले असल्याचे दुकानदारांनी सांगितले.

दरम्यान, दुकानदारांच्या या मागण्यांबाबत राज्य सरकारकडून कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. तसेच आचारसंहितेमुळे प्रमुख नेत्यांसोबतच इतरही अधिकारी निवडणुकीच्या कामात व्यस्त आहेत. त्यामुळे या विषयावर चर्चा करण्यासाठी कोणी उपलब्ध नव्हते. पर्यायने एक पाऊल मागे घेत दुकान चालकांना हे आंदोलन मागे घेण्याची नामुष्की आली.

# बंडोबांना थंड करण्यात महायुती पास

## कसब्यातून कमल व्यवहारे, पर्वतीतून आबा बागूल, शिवाजीनगरमधून मनीष आनंद निवडणूक लढवण्यावर ठाम

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचा आखाडा रंगला असून आता उमेदवारदेखील ठरले आहेत. निवडणुकीचा उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत सोमवारी (दि. ४) संपली. बंडखोर उमेदवारांची मनधरणी करून बंडखोरी रोखण्यात सत्ताधारी महायुतीला यश आले आहे. मात्र, महाविकास आघाडीतील उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने बंडखोरी रोखण्यात अपयश आल्याने आघाडीच्या अधिकृत उमेदवारांची डोकेदुखी वाढली आहे. त्यामुळे बंडखोरांचा नेमका फायदा कोणाला अन् तोटा कोणाला हे आता निवडणूक निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे अधिकृत उमेदवार म्हणून विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर यांना महाविकास आघाडीकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांचा थेट सामना भाजपचे अधिकृत उमेदवार हेमंत रासने यांच्या सोबत होणार आहे. विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचा बालेकिल्ला धंगेकरांनी खेचून आणला होता. त्यामुळे आताच्या पराभवाचा वचपा काढण्यासाठी भाजपने संपूर्ण तयारी केली असून काही करून भाजपचा उमेदवार निवडून आणण्यासाठी ताकद लावली आहे. त्यामुळे काँग्रेसला पूर्ण ताकदीनिशी लढावे लागणार आहे. परंतु कसबा विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी महापौर कमल व्यवहारे यांनी अपक्ष अर्ज दाखल केल्याने धंगेकरांची डोकेदुखी वाढली आहे.

शिवाजीनगरमधून काँग्रेसतर्फे दत्ता बहिरट यांना तिकीट देण्यात आले आहे. येथून काँग्रेसच्याच मनीष आनंद यांनी बंडखोरी केली आहे. काँग्रेससह महाविकास आघाडीच्या अनेक नेत्यांनी मनधरणी करूनदेखील त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही. ते निवडणूक लढवण्यावर ठाम असल्याने शिवाजीनगरमध्येही काँग्रेसची डोकेदुखी वाढली आहे.

यंदाच्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीच्या माध्यमातून प्रत्येकी तीन पक्ष एकत्रित आल्याने नाराजांची संख्या वाढली आहे. इच्छुक असताना उमेदवारी न मिळाल्याने तसेच मतदारसंघ मित्र पक्षाला सुटल्याने नाराज असलेले नेत्यांनी पक्षाची बंडखोरी करत अपक्ष अर्ज दाखल केले आहेत. या बंडोखोरांना थंड करण्यासाठी पक्षाकडून विविध यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या होत्या. परंतु काही बंडखोरांना थंड करण्यात काही पक्षांना अपयश आले. कसबा, पर्वती आणि शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील बंडखोरांनी अर्ज कायम ठेवून निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला.



### शरद पवारांशी फोनवर बोलणे होऊनही बागूल बंडखोरीवर ठाम

» पर्वतीतून राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) यांना महाविकास आघाडीतर्फे अश्विनी कदम यांना तिकीट देण्यात आले आहे. मात्र, येथून काँग्रेसच्या आबा बागूल यांनी बंडखोरी करीत उमेदवारी अर्ज दाखल केला होता. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांनी बागूल यांचे शरद पवार यांच्याशी फोनवर बोलणेही करून दिल्याचे सांगितले. तरीदेखील बागूल हे निवडणूक लढण्यावर ठाम असून त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतलेला नाही. बागूल यांच्यामुळे कदम यांच्या मतांवर परिणाम होऊन याचा फायदा मिसाळ यांना होईल, असा दावा केला जात आहे.

### जिल्ह्यातून 968 अर्ज मागे, 304 उमेदवार रिंगणात

» पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघात ३०४ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरल्याचे सोमवारी स्पष्ट झाले. पुणे जिल्ह्यात तब्बल १,२७२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ९६८ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. वडगाव शेरी मतदारसंघात २४ जणांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ८ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले असून आता १६ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. शिवाजीनगरमधून ७ जणांची माघार घेतली असून १३ उमेदवार रिंगणात आहेत. कोथरूडमध्ये १२, खडकवासला येथून १४, पर्वतीतून १५, हडपसरमधून १९, पुणे कॅन्टोंमेंटमधून २० तर कसब्यातून १२ उमेदवार रिंगणात आहेत.

# निवडणूक प्रचारात सहभागी झाल्यास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर कारवाई

## प्रचारात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास शिस्तभंगाची कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रचारात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. त्याबाबतचे निर्देश उच्च शिक्षण विभागाने राज्यातील सर्व विद्यापीठ, महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्थांना दिले आहेत.

उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी या बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. त्यानुसार आचारसंहिता नियमाचे पालन करण्याबाबतचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. राज्यातील विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी समाईक परिनियम अस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदी लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही, त्यांच्याशी संबंध ठेवता येणार नाही किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कामात कोणत्याही प्रकारे भाग घेता येणार नाही अथवा सहाय्य करता येणार नाही, असे परिपत्रकात नमूद केले आहे.



कोणताही कर्मचारी विधानसभेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुकीत प्रचार करु शकणार नाही, हस्तक्षेप करु शकणार नाही, त्यासंबंधी आपले वजन खर्च करु शकणार नाही किंवा त्यात भाग घेऊ शकणार नाही. त्यामुळे विद्यापीठ किंवा संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षांच्या निवडणूक कामात किंवा प्रचार कामात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कठोर कारवाई करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना देण्यात आली आहे. त्यात महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना मतदान करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

# मतदारयादीचा भूतकाळातही 'गोंधळ'

## राजकीय पक्षांचा आणि उमेदवारांकडून मतदारयादीच्या गोंधळाच्या आरोपांचा इतिहास जुना आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मतदारयादीत नाव नोंदविण्याची प्रक्रिया वर्षभर निरंतर चालू असते. मात्र, यादीत आपले नाव आहे का, याकडे पाच वर्षांत कोणी ढुंकून पाहत नाही. कोणत्याही निवडणुका आल्या, की मतदारांचा 'भाव' वधारतो आणि राजकीय पक्ष हे अचानक जागे होतात. पण तरीही मतदानाच्या दिवशी यादीत नाव नसणे, बोगस मतदारांची नावे असल्याची ओरड होऊन सदोष मतदारयादीचा गवगवा होतो. तोपर्यंत निकाल लागतो आणि पुन्हा मतदारयादीचा विषय पाच वर्षांसाठी थांबतो. पुण्यात मतदारयादीचा हा गोंधळ नवीन नाही. पुणे ही नगरपालिका असल्यापासून म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळापासून मतदारयादीतील गोंधळालाही इतिहास आहे. तेव्हाही यादीचे गोंधळ असायचे आणि आता अत्याधुनिक युगातही यादीचा गोंधळ थांबलेला नाही. आताही विधानसभा निवडणुकांच्या माध्यमातून लोकशाहीचा उत्सव साजरा होणार असताना, मतदारयादीचा गोंधळ घातला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.



मतदारयादीतील गोंधळ हा मतदानाच्या दिवशी कायम चर्चेचा विषय असतो. मतदारयादीत नाव नसणे यापासून बोगस मतदारांची नावे यादीत असण्यापर्यंत सर्व प्रकारच्या तक्रारी केल्या जातात. राजकीय पक्ष अशा प्रसंगी प्रशासनाच्या कारभारावर टीका करायला सरसावतात. प्रशासनाकडून जाणीवपूर्वक नावे वगळल्याचे किंवा बोगस मतदार समाविष्ट केल्याचे आरोप राजकीय पक्षांकडून केले जातात. प्रामुख्याने विजयाची खात्री नसलेले उमेदवार आणि त्यांचे समर्थक हे प्रशासनाच्या कारभाराकडे बोट दाखवून मोकळे होतात. मात्र, प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध झाल्यानंतर आपल्या मतदारसंघातील मतदारांची नावे आहेत का, हे तपासण्याची तसदी काही राजकीय पक्षांनी घेतलेली नसते. उलट, ऐन वेळी आपल्या विचारांच्या मतदारांचे नाव यादीत यावे, यासाठी त्यांची धडपड असते. यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आणि मतदानाच्या दिवशी प्रशासनावर टीका करण्यात आणि निवडणुकीवर प्रश्नचिन्ह उभे करण्यात हे राजकीय पक्ष अग्रेसर राहतात.

# अश्विनी जगताप यांचा 'डोअर टू डोअर' प्रचार

## महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्याच पाठीशी राहणार असल्याचे नागरिकांचे आश्वासन



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी पिंपळे निलख परिसरात दौर केला. या दौऱ्यात त्यांनी विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्थानिक नेते, आणि सामान्य नागरिकांशी 'डोअर टू डोअर' भेट घेत संवाद साधला.


यावेळी ज्येष्ठ नेते सचिन साठे, माजी पोलीस पाटील भुलेश्वर नांदगुडे, युवा नेते नितीन इंगवले, माजी नगरसेविका आरती चोंधे, अरुणा गायकवाड, माजी नगरसेवक संदीप कस्पटे, स्नेहा कलाटे, काळूरामशेठ नांदगुडे, नंदू बालवडकर, बाळासाहेब जगताप, संतोष साठे, माऊली साठे, अनिल संचेती, सुरेश गायकवाड, आनंद साठे, सोमनाथ इंगवले, अनंत कुंभार, शिरीष साठे, रणजीत कलाटे, आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल व्हावळकर, सूर्यवंशी मॅडम यांच्यासह महायुतीतील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार अश्विनी जगताप यांनी यावेळी 'डोअर टू डोअर' भेट देत नागरिकांची संवाद साधला. त्या म्हणाल्या की, पिंपरी चिंचवड शहराचा भौगोलिक विकास पाहता चिंचवड विधानसभा मतदारसंघ हा एक विकसित विधानसभा म्हणून उदयास आला आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वात पिंपळे निलख, विशाल नगर या परिसराचा कायापालट झाला आहे. चिंचवड मतदार संघातील विकासाला चालना देत असताना इतर सर्व प्रभागांसोबत प्रभाग क्रमांक २६ मध्ये देखील खूप मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्यात आली आहेत. येणाऱ्या काळामध्ये या विकासाला गती देण्याचे स्वप्न उराशी बाळगून महायुतीचे उमेदवार शंकर जगताप हे या निवडणुकीला आपल्या समोर जात आहेत. आपण चिंचवडच्या विकासासाठी आणि आपल्या शहराला जगाच्या पाठीवर विकसित विधानसभा ओळख मिळावी यासाठी शंकर जगताप यांना क्रमांक २ समोरील कमळ या चिन्हासमोरील बटण दाबून विजयी करा असे आवाहन अश्विनी जगताप यांनी केले.

अश्विनी जगताप यांच्या या दौऱ्यास पिंपळे निलख तसेच विशाल नगर परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप व त्यानंतर अश्विनी जगताप यांच्यामुळेच आमच्या भागाचा सर्वांगीण विकास झाला आहे. यापुढेही येथील विकासाला आणखी गती मिळावी याकरिता आम्ही शंकर जगताप यांच्याच पाठीशी ठामपणे उभे राहणार असल्याचे आश्वासन नागरिकांनी यावेळी दिले.

# आयटीएमएसद्वारे तब्बल 5 लाख वाहनांना दंड!

## 'आयटीएमएस'मुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत : 90 किलोमीटरवर कॅमेऱ्यांची नजर



**पिंपरी | प्रतिनिधी**

वाहनातील वेगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच, वाहतुकीची शिस्त लावण्याबाबत राज्य शासनाकडून पुढाकार घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील आयटीएमएस सिस्टीमचे काम पूर्ण झाले असून, वाहतूक नियमांचे पालन न करणारे वाहनचालक दंडात्मक कारवाईला पात्र ठरणार आहेत. 'आयटीएमएस'मुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. आत्तापर्यंत जवळपास पाच लाखाहून अधिक वाहनांना दंड ठोठावण्यात आला आहे. त्याचप्रमाणे वाहन चालकाचे समुपदेशनदेखील सुरू असल्याची माहिती आरटीओच्या वतीने देण्यात आली.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील अपघाताची सुरक्षा विचारात घेऊन अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्ते विकास महामंडळाने संपूर्ण ९० किलोमीटर अंतराच्या रस्त्यावर आयटीएमएस प्रणाली बसवण्याचे काम गेल्या सहा महिन्यांपूर्वी हाती घेतले होते. ते सध्या पूर्ण झाले असून ही पद्धत नुकतीच सुरू केली आहे. आयटीएमएस म्हणजे इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम असून, राज्य शासन आणि पिंपरी चिंचवड, पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयअंतर्गत यावर नियंत्रण राहणार आहे. याबाबत दोन्ही विभागांचे प्रत्येकी एक साहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यावरती देखरेख ठेवत आहेत.

सॅटेलाईटद्वारे संपूर्ण माहिती नियंत्रण कक्षाला तत्काळ कळते. यासाठी ९० किलोमीटर अंतरावरच्या रस्त्यावर संभाव्य अपघातग्रस्त १०६ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. हे सर्व कॅमेरे आयटीएमएस पद्धतीने सॅटेलाईटद्वारे कुसगाव येथील नियंत्रण कक्षाला जोडले आहेत. या पद्धतीमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांच्या सर्व हालचालींची माहिती कॅमेऱ्यात कैद होते. त्यामुळे वाहतूक नियमांचे पालन न करणारे, अतिवेगाने वाहन चालवणे, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे, लेन कटिंग आदींसह अपघात झाला किंवा कोणतीही घटना घडली तर याची माहिती नियंत्रण कक्षाला तत्काळ कळते.

त्यामुळे काही मिनिटांत अपघातग्रस्तांना मदत पुरवणे शक्य झाले आहे. या प्रणालीमुळे वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांना दंडाचा भुर्दंड बसत असून, वाहन प्रकारानुसार किमान पाचशे ते दोन हजार रुपये दंड हा भरावा लागत आहे.

याबाबत संबंधित वाहनाचा फोटो नियंत्रक कक्ष प्राप्त होतो. त्यानंतर त्याची खातरजमा करून आरटीओच्या माध्यमातून त्याबाबत वाहनचालकांना चलन प्राप्त होते. याचबरोबर रस्त्यावरती धावणाऱ्या वाहनचालकांना आवश्यक ते समुपदेशनदेखील आरटीओच्या वतीने देण्यात येत आहे. यासाठी एक स्वतंत्र पथकदेखील तैनात आहे. त्या अनुषंगाने काम सुरू आहे.

### नियमाचे उल्लंघन, दंडाची पावती

**» द्रुतगती मार्गावर बोरघाटात वेग मर्यादेचा विसर पडलेले वाहनचालक रस्ता मोकळा असल्यास वाहतूक नियमांचे उल्लंघन करून सुसाट जातात, याची नोंद नियंत्रण कक्षाला होत असते. नियंत्रण कक्षाकडून यांची संपूर्ण माहिती आरटीओ व विशेष दंडात्मक कारवाई करणाऱ्या पथकाकडे जाते. त्यांच्यामार्फत नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकास दंडाचा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे नियमाच्या उल्लंघनाप्रमाणेच वेगावरदेखील नियंत्रण ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

" वाहनचालकांचे नियमांचे पालन करण्याकडे कल वाढला आहे. जून महिन्यापासून म्हणजेच जवळपास पाच महिन्यात जवळपास पाच लाख वाहनांवर दंड करण्यात आला आहे. द्रुतगती मार्गावर जाताना २० आणि येताना १९ अशा ३९ एन्ट्री आहेत. त्या माध्यमातून नजर ठेवण्यात येत आहे.

- राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी.

# पुणे जिल्ह्यात नऊ ठिकाणी बंडखोरी

## महायुती आणि महाविकास आघाडीसमोर अनुक्रमे पाच व चार ठिकाणी आव्हान

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत पुणे जिल्ह्यातील २१ मतदारसंघांपैकी आठ ठिकाणी बंडखोरी कायम राहिली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीला बाकी ठिकाणी बंडखोरांची मनधरणी करण्यात यश आले आहे. मावळ, भोर, इंदापूर, पुरंदर, जुन्नर, चिंचवड आणि पुण्यातील पर्वती, कसबा आणि शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघांत बंडखोरी झाली आहे. यात पुण्यातील चार मतदारसंघांत महाविकास आघाडीचे बंडखोर उमेदवार असून, मावळ, भोर, पुरंदर, जुन्नर आणि चिंचवडमध्ये महायुतीच्या उमेदवारांनी बंडाचा झेंडा कायम ठेवला आहे.




विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागांवरून एकमत न झाल्याने अनेकांनी परस्परांविरोधात उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यामुळे बंडखोरांची समजूत काढण्याचे आव्हान महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांपुढे उभे राहिले होते. महाविकास आघाडीमध्ये चार ठिकाणी, तर महायुतीमध्ये तीन ठिकाणी बंडखोरी झाल्याचे चित्र सोमवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढे आले. या बंडखोरीचा फायदा कोणत्या उमेदवाराला होणार याबाबत आता चर्चा सुरू झाली आहे.

पुण्यात माजी उपमहापौर, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आबा बागुल यांनी पर्वती मतदारसंघातून उमेदवारी अर्ज कायम ठेवला. त्यांच्यासह कसब्यातून पुण्याच्या पहिल्या महिला महापौर, काँग्रेसच्या माजी महिला प्रदेशाध्यक्ष कमल व्यवहारे यांनीही बंडखोरी केली आहे. तर, शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातून खडकी कँटोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष मनीष आनंद निवडणूक लढविणार आहेत. या तिघांनी उमेदवारी अर्ज मागे घ्यावेत, यासाठी महाविकास आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी गेल्या दोन दिवसांसून त्यांची सातत्याने भेट घेऊन मनधरणी करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तो अपयशी ठरला. काँग्रेसच्या या तिघा बंडखोरांमुळे महायुतीमधील भाजपच्या अनुक्रमे माधुरी मिसाळ, हेमंत रासने आणि सिद्धार्थ शिरोळे या उमेदवारांना त्याचा फायदा होईल, अशी चर्चा आहे.

जिल्ह्यात मावळ मतदारसंघात महायुतीमधील राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे बापू भेगडे यांनी बंडखोरी करून अपक्ष अर्ज भरला होता. भेगडे यांच्या उमेदवारीला राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षानेही पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. तसेच, भाजप पदाधिकाऱ्यांनीही भेगडे यांच्या उमेदवारीला समर्थन दिले होते. त्यामुळे त्यांनी अर्ज कायम ठेवला असून, महायुतीचे उमेदवार सुनील शेळके यांच्यापुढे आव्हान निर्माण झाले आहे.

पुरंदर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे नेते, माजी सनदी अधिकारी संभाजी झेंडे यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. त्याचा फटका शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार माजी मंत्री विजय शिवतारे यांना बसण्याची शक्यता असून, येथे तिरंगी लढत होणार आहे. भोर मतदारसंघातही शिवसेनेचे (शिंदे) नेते कुलदीप कोंडे यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. महायुतीच्या जागावाटपात भोरची जागा राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाकडे गेल्याने ते नाराज होते. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीनंतर कोंडे यांनी शिवसेना (ठाकरे) पक्षातून शिवसेना (शिंदे) पक्षात प्रवेश केला होता. कोंडे यांची बंडखोरी महाविकास आघाडीच्या पथ्यावर पडेल, असे चित्र सध्या आहे.

इंदापूर मतदारसंघात महाविकास आघाडीने भाजपमधून आलेले माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी दिल्याने राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे स्थानिक नेते नाराज झाले होते. त्यापैकी सोनाई उद्योग समूहाचे संचालक प्रवीण माने यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले होते. त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला, पण तो अपयशी ठरला. माने यांच्या उमेदवारीमुळे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या अडचणींत वाढ होईल, अशी चर्चा आहे. त्यातच जिल्हा बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे यांनी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षात प्रवेश करून, त्या पक्षाचे उमेदवार दत्तात्रेय भरणे यांना पाठिंबा देणार असल्याचे म्हटल्याने पाटील यांच्यासमोर आव्हान असेल.

जुन्नरमध्ये शिवसेना (शिंदे) पक्षाचे माजी आमदार शरद सोनवणे आणि भाजप नेत्या आशा बुचके यांनी अपक्ष म्हणून अर्ज कायम ठेवला आहे. त्यामुळे जुन्नरमध्ये महायुतीचे उमेदवार अतुल बेनके यांच्यासमोर आव्हान उभे राहिले आहे.

### चिंचवडमध्ये तिरंगी लढत होणार

» चिंचवड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला आहे. त्यामुळे चिंचवडमध्ये तिरंगी लढत होणार असून, भोईर यांच्या बंडखोरीचा फायदा भाजपचे उमेदवार शंकर जगताप यांना, की राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे राहुल कलाटे यांना होणार, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

# श्रीमंत दगडूशेठ गणपतीला तब्बल 1100 नारळांचा महानैवेद्य

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती मंदिरात श्री उमांगमलज जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**पुणे | प्रतिनिधी**

गाणपत्य संप्रदायामध्ये कार्तिक शुद्ध चतुर्थीनिमित्त श्री उमांगमलज जन्मोत्सवात तब्बल ११०० नारळांचा महानैवेद्य दाखवून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची मंगळवारी पूजा बांधण्यात आली. ‘श्रीफला’मध्ये सजलेल्या गणरायाचे रूप डोळ्यांमध्ये साठवून घेण्याबरोबरच भाविकांनी मोबाईलमध्ये गजाननाचे छायाचित्र टिपले.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती मंदिरात श्री उमांगमलज जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नारळांची आरास करण्यात आली. पहाटे तीन वाजता ब्रह्मणस्पती सूक्तपठण झाले. रसिक कुलकर्णी आणि सानिका कुलकर्णी यांनी स्वरपूजा बांधली.

ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, ‘देवी पार्वतीने अंगावरच्या मळापासून एक पुतळा बनवला. त्याला जिवंत केले. पुढे त्याचे आणि शंकरांचे युद्ध झाले. भगवान शंकरांनी त्या मुलाचे मस्तक उडविले. देवी पार्वतीच्या संतापाला शांत करण्यासाठी शेवटी त्या बालकाच्या धडावर भगवान श्री विष्णूंनी आणलेले गज मस्तक बसविण्यात आले आणि त्यालाच श्री गजानन असे म्हटले आहे. ही श्री गणेश जन्माची कथा आपण नेहमी ऐकतो ती या अवताराची कथा आहे. या अवतारात उमांगमलज हे गणेशाचे नाव आहे. आपली बुद्धी हीच पार्वती देवी आहे. तिच्यावर चढलेला अहंकार आणि ममत्वाचा थर हाच मळ आहे. हा अहंकार आणि ममत्व दूर झाले की ज्या मोरयांची प्राप्ती होते त्यांना उमांगमलज असे म्हणतात.’